महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४००००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४५०, ४४२, ४४३
ई-मेल — desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट : http://www.dte.maharashtra.gov.in

क्रमांक : २/एनजीसी/मान्यता-२०२२/ ५२२ दिनांक: - 4 JUL 2022

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,
अमरावती व नागपूर.

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता नवीन बी. फार्मसी अभ्यासक्रमाची संस्था सुरू करण्यास फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया नवी दिल्ली यांचे पोर्टल वर ऑन लाईन अर्ज केलेल्या तथा करण्यात येणा-या संस्थांना शासन ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याबाबत......

संदर्भ :- १) फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया यांनी त्यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द केलेले पत्र क्र. १४-५६/२०२२ (Approval Process for २०२२-२०२३ as) /११९४२-४६, दि. ०३.०७.२०२२
२) फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया यांनी त्यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द केलेले पत्र क्र. १४-५६/२०२२ (Approval Process for २०२२-२०२३ as) /११६२१-२३, दि. २१. ०६.२०२२
३) या संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक क्रमांक २/ एनजीसी/ मान्यता/ पीसीआय २०२२/५२१, दि. ०४/०७/२०२२

फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी मा. सर्वोच्च न्यायालयाने पारित केलेल्या दि. ३१.०५.२०२२ च्या न्यायआदेशास अनुसरून नवीन औषधनिर्माणशास्त्र संस्था सुरू करण्यासाठी दि. ०३.०७.२०२२ ते दि. १५.०७.२०२२ पर्यंत अर्ज करण्यासाठी त्यांचे पोर्टल सुरू केले आहे. फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी बी. फार्मसी अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरू करण्यासाठी राज्य शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र अनिवार्य केले आहे. यास्तव अशा संस्थाना राज्य शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्रासाठीचा प्रस्ताव आपले कार्यालयाकडे दि. ०७.०७.२०२२ पर्यंत जमा करण्यास संदर्भ क्रमांक ३ अन्वये सुचित केले आहे.

वरील परिच्छेदात नमूद केल्यानुसार राज्य शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्रासाठी आपले कार्यालयात प्राप्त झालेल्या प्रस्तावांसाठी दि. २२.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये निर्धारीत केलेले नोंदणी शुल्क घेण्यात यावे. तसेच सदर प्रस्तावांची त्रिसदस्यीय तपासणी समितीमार्फत फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया यांचे मानकाप्रमाणे तपासणी करुन तपासणी अहवाल आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह प्रस्ताव दि. ११.०७.२०२२ रोजी खास दुतामार्फत या संचालनालयास निश्चितपणे सादर करण्यात यावा.

(डॉ.अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पत्र क्र. 10/एनजीसी/मान्यता -2022/522/~~2153~~
दि. 04/07/2022
पृ.क्र.तंशिस/विकाना/शैवि/2022/ 2153
सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर
दिनांक:- 04 JUL 2022

प्रति,
प्राचार्य,
सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी व पदवीका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर

यांना कळविण्यात येते की, ज्या संस्थांना नवीन औषधनिर्माणशास्त्र संस्था सुरु करावयाचा आहे अशा संस्थांनी उपरोक्त पत्रात नमुद केल्यानुसार कार्यवाही करुन, प्रस्ताव विहीत मुदतीत या कार्यालयास सादर करावे.

(डॉ. मनोज भा. डायगव्हाणे)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.११९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४५०, ४४२, ४४३
ई-मेल – desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट : http://www.dte.maharashtra.gov.in

क्रमांक : २/एनजीसी/मान्यता-२०२२/५२१ दिनांक: - 4 JUL 2022

परिपत्रक

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता नवीन बी. फार्मसी अभ्यासक्रमाची संस्था सुरू करण्यास फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया नवी दिल्ली यांचे पोर्टल वर ऑन लाईन अर्ज केलेल्या तथा करण्यात येणा-या संस्थांना शासन ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याबाबत......

संदर्भ :- १) फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया यांनी त्यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द केलेले पत्र क्र. १४-५६/२०२२ (Approval Process for २०२२-२०२३ as) /११९४२-४६, दि. ०३.०७.२०२२

२) फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया यांनी त्यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द केलेले पत्र क्र. १४-५६/२०२२ (Approval Process for २०२२-२०२३ as) /११६२१-२३, दि. २१. ०६.२०२२

फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी मा. सर्वोच्च न्यायालयाने पारित केलेल्या दि. ३१.०५.२०२२ च्या न्यायआदेशास अनुसरून नवीन औषधनिर्माणशास्त्र संस्था सुरू करण्यासाठी दि. ०३.०७.२०२२ ते दि. १५.०७.२०२२ पर्यंत अर्ज करण्यासाठी त्यांचे पोर्टल सुरू केले आहे. फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी संदर्भ क्रमांक १ च्या पत्रात खालील प्रमाणे नमूद केले आहे.

**"In pursuance of judgment dt. 31.05.2022 passed by Hon'ble Supreme Court, the PCT portal has been opened from 3.7.2022 to 15.07.2022 for new Institution. It is clarified that mere submission of application does not mean approval and further action would be subject to outcome of Hon'ble Supreme Court judgement"**

फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया,नवी दिल्ली यांचे संदर्भ क्रमांक १ व २ चे पत्र, अभ्यासक्रम निहाय "Schemes" नुसार बी. फार्मसी अभ्यासक्रमाच्या नवीन संस्थांसाठी शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र आवश्यक आहे. यास्तव राज्यातील ज्या संस्थांनी नवीन बी.फार्मसी अभ्यासक्रमाची संस्था सुरू करण्यासाठी पीसीआय चे पोर्टलवर अर्ज केले असतील किंवा करणार असतील अशा संस्थांनी दि. ०७.०७.२०२२ पर्यंत शासन ना हरकत प्रमाणपत्रासाठीचा प्रस्ताव संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे सादर करावा. त्याचप्रमाणे प्रस्तावासोबत संबंधित विद्यापीठाचे "Consent of Affilation" अनिवार्य असून ते संदर्भ क्रमांक १ च्या पत्रात नमूद केल्यानुसार शै. व. २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठीचेच असेल.

संबंधित संस्थानी प्रस्ताव सादर केल्यानंतर प्रत्यक्ष तपासणीसह सर्व औपचारीक कार्यवाही होऊन प्रत्यक्ष शासन ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित होणे इ.साठी पुरेसा अवधी अपेक्षीत आहे, यास्तव संबंधित संस्थानी सहसंचालक, तंत्र शिक्षण, संबंधित विभागीय कार्यालये यांचेकडे दि. ०७.०७.२०२२ पर्यंत प्रस्ताव सादर करावेत अन्यथा शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्रासाठी विलंब झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधित संस्थांची राहील याची नोंद घेण्यात यावी.

येथे असेही नमूद करण्यात येते की, विना अनुदानित तत्वावर पदवी, पदव्युत्तर पदवी, पदविका पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थाच्या विविध प्रस्तावांकरीता नोंदणी शुल्क निर्धारीत केलेले आहे. त्यानुसार संदर्भ क्रमांक १ च्या पत्रास अनुसरुन राज्यातील नवीन औषनिर्माणशास्त्र संस्था (डी.फार्मसी, बी. फार्मसी. एम.फार्मसी) इ. साठीचे नोंदणी शुल्क संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये याचेकडे अदा करण्यात यावे.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत, १) सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
२) कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई

f:\vijay_06022018\kedare\approval process\2022\pci\circular new institutes.docx